● शुक्रवार, दि. ३ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५६ वा ● किमंत २ रु. ● पा१.ने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## मराठवाडा शिक्षक संघांची धडक आता विभागीय बोर्डावर

### येत्या ८ जानेवारीला धरणे आंदोलन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** दहावी- बारावी चे केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, परीक्षक, मॉडरेटर,चिफ मॉडरेटर यांचे मानधन वाढविणे या व इतर मागण्यांसाठी दिनांक ०८ जानेवारी २०२५ रोजी मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ कार्यालयासमोर लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण महामंडळ दहावी व बारावीच्या परीक्षा आयोजित करते. ही परीक्षा संपन्न करण्यासाठी परीक्षा आयोजित करण्यात केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे तर त्यानंतर परीक्षक, मॉडरेटर, चिफ मॉडरेटर हे पेपर तपासणी करून निकाल लावण्यात महत्वाची भूमिका

**पान २ वर**





आमदार बबनराव लोणीकर यांचा जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला दणका

## १७ जेसीबी मशीन, ७ टीमसह ५० लोकांची टीम युद्ध पातळीवर काम पूर्ण करणार; महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची ग्वाही

**मुंबई । प्रतिनिधी -** १७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर ग्रीड मधील बरेचसे काम न करता कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी संगणमताने आर्थिक व्यवहार करत पूर्ण बिल उचलले आहे त्या विरोधात आमदार बबनराव लोणीकर यांनी वारंवार घेण्यात आलेल्या बैठका व सातत्याने करण्यात आलेला पाठपुरावा या दणक्यामुळेच आज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला वठणीवर आणले असून पुढील २ महिन्यात उर्वरित काम पूर्ण करून देण्याची हमी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव यांनी घेतली असल्याची माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दालनात आज बैठक संपन्न झाली या बैठकीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी व कंत्राटदार यांना धारेवर धरत परतुर विधानसभा मतदार संघातील १७६ गाव व ९५ गाव वॉटर ग्रीड योजनांचे काम न करता बिल उचललेच कसे असावा सदस्य सचिवांच्या समोर उपस्थित केला. ७ डिसेंबर २०२३ रोजी १७६ गाव वॉटर ग्रीड चे बिल देण्यात आले त्या तारखेपर्यंत ५२ गावात पाणी पोहोचलेले नव्हते तर २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ गाव वॉटर ग्रीड मधील एकाही गावांमध्ये थेंब भर पाणी पोहोचलेले नसताना पूर्ण बिल देण्यात आले असल्याची तक्रार आमदार बबनराव लोणीकर यांनी सदस्य सचिव यांच्याकडे केली होती त्या तक्रारीनुसार आज सदस्य सचिवांच्या दालनात कंत्राटदार, अधिकारी यांच्यासह आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली



शासनाला खोटी माहिती देऊन या दोन्ही योजनेचे संपूर्ण बिल उचलण्यात आले असल्याची तक्रार आमदार लोणीकर यांनी दिली होती त्या संदर्भात तहसील कार्यालय मंठा तहसील कार्यालय परतुर मुख्य अभियंता कार्यालय छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी बैठका घेण्यात आल्या. २०२४ मध्ये मुंबईत संपन्न झालेल्या

**पान २ वर**

दर्पण दिन २०२५ निमित्त

# पत्रकार सन्मान सोहळा
## व आमदारांचा जाहीर सत्कार

पीसीएम जिल्हा रत्न पुरस्कार
ज्येष्ठ व युवा पत्रकार सन्मान पुरस्कार
पत्रकार-समाजसेवक पुरस्कार

पत्रकारांची जिल्हास्तरीय बॉक्स क्रिकेट लिग स्पर्धा
जिल्ह्यातील सर्व पत्रकारांचा सत्कार
पेपर वितरीत करणाऱ्या गरीब मुलांस सायकल भेट

जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदार महोदयांचा जाहीर सत्कार

मा. श्री. अर्जुनरावजी खोतकर
आमदार, जालना विधानसभा मतदार संघ

मा. श्री. बबनरावजी लोणीकर
आमदार, परतूर विधानसभा मतदार संघ

मा. श्री. संतोष पा. दानवे
आमदार, भोकरदन विधानसभा मतदार संघ

मा. श्री. नारायणजी कुचे
आमदार, बदनापूर विधानसभा मतदार संघ

मा. श्री. हिकमतदादा उढाण
आमदार, घनसावंगी विधानसभा मतदार संघ

पत्रकार संरक्षण कायदा व ऑनलाईन पत्रकारिता विषयी मार्गदर्शन

भारती लॉन्स, भोकरदन नाका, राजुर रोड, जालना.
सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५ सकाळी ११ वाजता

विनीत
दीपक शेळके, दर्पण जैन, गणेश काबरा,
नितेश महाजन, आमेर खान, शेख चांद पी.जे., नरेंद्र जोगड, बाबुजी तिवारी, सय्यद रफिक, सुनील भारती, प्रा. दत्ता देशमुख,
मजहर सौदागर, आशिष तिवारी, दिनेश नंद, चेतन बजाज, शेख अशफाक, सौ. करुणा मौरे, शेख नबी सिपोराकर

आयोजक : प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हा

## संपादकीय पान

# स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले



महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे ३ जानेवारी २०२३ रोजी १९४ वि जयंती. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे.



१८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**





माजी राज्यमंत्री, शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांना विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयाबद्दल व त्यांच्या वाढदिवसानिमित्त संदीप गिंदोडीया यांनी ५१ किलो पेढे वाटप केले. प्रसंगी अर्जुनराव खोतकर यांना वाढदिवसांनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी संजय खोतकर यांच्यासह उमेश पंचारीया, आदित्य बगडीया, दिलीप गौड, दिनेश पाटील, उमेश पेंढारकर, हर्ष पंचारीया आदींची उपस्थिती होती. दुसऱ्या छायाचित्रात आमदार खोतकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना लखन कणसे व मित्र मंडळ.

# राज्य रस्ता सुरक्षा अभियानाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयापासून जनजागृती रॅली

## जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी दाखविला हिरवी झेंडा


**जालना | प्रतिनिधी -** जालन्यात राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत जिल्ह्यात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस, शिक्षण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने रस्ता सुरक्षाविषयक बॅनरद्वारे जनजागृती करणे, शाळा, महाविद्यालयात रस्ता सुरक्षाविषयक व्याख्यान आयोजित करणे, रस्त्यावरील बैलगाडी, ट्रॅक्टर आणि ट्रॉली वाहनांना परावर्तिका (रिफलेक्टर) लावणे, वाहन चालकांची आरोग्य तपासणी करणे, मोटार ड्रायव्हींग स्कूल कार्यशाळा आयोजित करणे तसेच जिल्ह्यातील रस्ते अपघातास कारणीभूत बाबींची तपासणी करणे आदी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.

गुरूवार (दि २) रोजी दुपारी दोनच्या सुमारास उप प्रादेशिक परिवहन कार्यालय जालनाच्या वतीने आयोजित रस्ता सुरक्षा रथ अभियान आणि रॅलीचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले.यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ राजेंद्र पाटील, महानगरपालिका उपायुक्त नंदा गायकवाड, स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा प्रबोधीनीचे संचालक सुधीर हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. रस्ता सुरक्षा रॅली जिल्हाधिकारी कार्यलयापासुन सुरुवात होऊन मोती बाग, औरंगाबाद चोफुली मार्गे उप प्रदेशिक परिवहन कार्यालय येथे रॅलीचा समारोप करण्यात आलाय. यावेळी सह्यायक



प्रदेशिक परिवहन अधिकारी, चंद्रमोहन कृष्णा चिंतलं, मोटर वाहन निरीक्षक भीमराज नागरे सुनील चव्हाण अनिल कदम, नितीन पाटील संजीवनी चोपडे, अमोल राजपूत, राजकुमार मुंडे, कर्मचारी शरद जोशी आसाराम घुले यांच्यासह कार्यातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी इंग्लिश स्कूल टेंभुर्णीच्या विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद



**टेंभुर्णी -** येथील संजीवनी प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल टेम्भूर्णी येथील विध्यार्थ्यांनी सहलीचा अनुभव घेतला. यावेळी विध्यार्थ्यांनी लोणार सरोवर , माँ जिजाऊ जन्म स्थळ सिंदखेड राजा, जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा तसेच गुगळा देवी या विविध ठिकाणी ऐतिहासिक तसेच सांस्कृतिक ठिकाणाविषयी माहिती मिळवली.सहलीचे दिनांक २९/१२/२०२४ वार रविवार रोजी आयोजन करण्यात आले होते. बालपणातच विध्यार्थ्यांना असे विविध ठिकाणे दाखवील्यामुळे पालकांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. सहल चे सर्व नियोजन सहल प्रमुख प्रा. सतिश जाधव सर यांनी केले तर सहल यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा डोमाळे मॅडम, उपमुख्याध्यापिका सौ भाग्यश्री जाधव मॅडम, वैशाली पंडित मॅडम, दिक्षा चंदनशिवे मॅडम, शिला जाधव मॅडम यांनी विशेष प्रयत्न केले. सहलीच्या यशस्वीतेसाठी अध्यक्षा सौ ज्योती सांगळे मॅडम यांनी विध्यार्थी, पालक व स्टाफ चे विशेष अभिनंदन केले.

# लाईन ब्लॉकमूळे काही रेल्वे गाड्या उशिरा धावणार तर मराठवाडा एक्सप्रेस अंशतः रद्द

## रेल्वे विभागाच्या जनसंपर्क कार्यालयाची माहिती




**जालना | प्रतिनिधी -** नांदेड रेल्वे विभागातील रंजणी आणि कोडी दरम्यान दिनांक ३ जानेवारी ते ०९ जानेवारी २०२५ दरम्यान चार तासांचा लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे काही रेल्वे गाड्या उशिरा धावणार आहेत आणि धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्सप्रेस धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

आज दि.०२ गुरूवार रोजी सायंकाळी पाच वा. रेल्वे विभागाच्या वतीने मिळालेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक १७६८८ धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्सप्रेस दिनांक ०३, ०५, ०६, ०९ आणि १० जानेवारी दरम्यान धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. या तारखेस ही गाडी नांदेड ते मनमाड अशी धावेल.

तर गाडी क्रमांक १७६६१ काचीगुडा-नगरसोल एक्सप्रेस दिनांक ०४, ०५, ०८ आणि ०९ जानेवारी २०२५ रोजी ९० मिनिटे उशिरा धावेल. गाडी क्रमांक १७२३२ नगरसोल-नरसापुर दवी-साप्ताहिक एक्सप्रेस दिनांक ०४ जानेवारी २०२५ रोजी ९० मिनिटे उशिरा धावेल. गाडी क्रमांक १२७८८ नगरसोल-नरसापुर एक्सप्रेस दिनांक ०५, ०८ आणि ०९ जानेवारी २०२५ रोजी ९० मिनिटे उशिरा धावेल.

# कौसल्याबाई अग्रवाल यांचे निधन

**परतूर | प्रतिनिधी -** येथील रा.स्व.संघाचे सक्रीय कार्यकर्ते, प्रतिष्ठित व्यापारी गणेश आणि श्रीकिशन अग्रवाल यांच्या मावशी तथा मनिष अग्रवाल आणि निखिल अग्रवाल यांच्या आजी श्रीमती कौसल्याबाई द्वारकादास अग्रवाल यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी बुधवारी(दि. १) रोजी सायंकाळी ४ वाजून ३० मिनिटांनी वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्यावर गुरुवारी(दि.२) सकाळी ९ वाजता परतूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक,व्यापारी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



पान १ वरुन

## मराठवाडा शिक्षक ...

निभावतात.

या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जाते. केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, लिपिक, शिपाई, परीक्षक, मॉडरेटर, चिफ मॉडरेटर यांचे मानधन वाढविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थी परीक्षा शुल्कात अनेकदा वाढ करण्यात आली आहे. परंतु केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, लिपिक, शिपाई,परीक्षक, मॉडरेटर, चिफ मॉडरेटर यांचे मानधन परीक्षा खर्च अनेक वर्षांपासून वाढविण्यात आलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण महामंडळाचे काम करणाऱ्या या घटकांवर मधे प्रचंड असंतोष व नाराजी आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी *मराठवाडा शिक्षक संघाने दिनांक ०८ जानेवारी २०२५ या दिवशी दुपारी ०४ ते ०६ या* वेळेत छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयासमोर लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागीय शिक्षण मंडळाशी संलग्न जिल्ह्यातील शिक्षक, मुख्याध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, मराठवाडा शिक्षक संघाचे कार्यकर्ते, केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, लिपिक, शिपाई,परीक्षक, मॉडरेटर, चिफ मॉडरेटर यांनी आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष ए.बी. औताडे, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष कैलास हाळदे, जिल्हा सचिव चंद्रकांत चव्हाण, जालना जिल्ह्याचे अध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा सचिव संजय येळवंते, जगनराव वाघमोडे, प्रेमदास राठोड, संघटनेचे कार्यकारिणीचे सदस्य यांनी केले आहे.

## १७ जेसीबी मशिन ...

पावसाळी विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान लक्षवेधी तारांकित प्रश्न, अर्धा तास चर्चा यासह विविध आयुधांचा वापर करून हा प्रश्न शासन दरबारी मांडला होता. परंतु अधिकारी व कंत्राटदारच्या काम न करण्याच्या मानसिकतेमुळे आमदार लोणीकरांनी सदस्य सचिवांकडे या सदर्भात बैठक आयोजित करून काम पूर्ण करून देण्याची मागणी केली होती. आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने केलेला पाठपुरावा व वारंवार घेतलेल्या बैठका यामुळे संबंधित कंत्राटदाराने तात्काळ काम पूर्ण करून देण्यात यावे असे आदेश सदस्य सचिवांनी दिले.

१७ जेसीबी मशीन, ७ टीमसह ५० लोकांची टीम युद्ध पातळीवर काम पूर्ण करणार असून लवकरात लवकर या दोन्ही ग्रीड चे काम पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वतीने बैठकीदरम्यान ग्वाही देण्यात आली आहे. या बैठकीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव कृष्णा, मराठवाडा विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, सदस्य सचिव कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री अजयसिंग यांची उपस्थिती होती.

## तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

# सेवा ग्रामसेवक ग्रामपंचायतचा मनमानी कारभाराचा आरोप




**मंठा । प्रतिनिधी -** मौजे पेवा येथील स.न. १५, ग.न. ४९, ५४ स.न. १६, ग.नं. ६९, स.न. १७, ग.न. ६९ स.न. १९, ग.न. ९४, ९४ मधील जमिनीच्या दिनांक ०२/०४/१९९१ रोजीच्या निकालानुसार या सर्वे गट नंबर मध्ये कसल्याही प्रकारची खरेदी विक्रि करण्यास मज्जाव करण्यात यावा असे विठ्ठल पांडुरंग लाखुळे रा. पेवा ता. मंठा येथील रहिवाशी असुन त्यांच्या नावे असलेल्या पेवा येथील स.न. १५, ग.न. ४९, ५४ स.न. १६, ग.नं. ६९, ६८ स.न. १८ ग.नं. ९१ स.न. १९, ९४ ताबा पावतीवर २.२४ आर जमीन आहे व स.न. १९ ग.न. ९५ मध्ये भाऊ (आंबादास पांडुरंग लाखुळे) मधील जमिनीच्या दि. ०२/०४/१९९१ रोजीच्या निकालानुसार या सर्वे नंबर व गट नंबर/जमिनीमध्ये ग्रामसेवक व ग्रामपंचायत यांनी या जमिनीचा जागेचा नमुना नं.८ परस्पर तयार करुन घेत आहेत त्या ठिकाणी घर बांधकाम करत असून पत्राचे शेड ठोकुन त्या राहत आहेत.आम्ही नमुना नंबर ८ मागितला की, आम्हांला देत नाही म्हणुन अशा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करुन नये किंवा खरेदी विक्री करु नये खरेदी विक्री केल्यास ग्राम पंचायत व ग्रामसेवक जबाबदार धरण्यात येईल आणि कोर्टाच्या नियम व अटिनुसार नमुना नंबर ८ अ जर कोणाला दिलेली असल्यास ते रद्द करण्यात यावा हायकर्टाचा व मंठा तहसीलचा खेरेदी विक्री करण्यास मनाई आदेश असतांना सुध्दा हे ग्रामसेवक व ग्रामपंचायत पेवा हे स्वताच्या मनमानी करभार करुन न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत असल्याचे कारण दाखवून निवेदकाने ता ०१ जानेवारी बुधवार रोजी तहसिल कार्यालयासमोर अमरण उपोषणास पुर्ण परिवारा सोबत बसून उपोषण सुरु केले आहे. हि जमीन माननीय न्यायालयाने आदिवासीं परिवाराला रितसर दिली मग इतर कोणालाही त्या जमिनीवर अधिकार करण्यात प्रतीबंध करण्यासाठी योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी आदेशाची आमलबजावणी करुन या मनमानी कारभार करणाऱ्या अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

ग्रामसेवकाला संपर्क साधला असता ग्रामसेवक यांनी बोलण्यास नकार दिला असून उद्या भेटून सांगतो असे प्रसार माध्यमाला सांगितले.

# उमंग बंग यांचा माहेश्वरी विवाह समितीतर्फे सत्कार

## जागतिक पातळीवर समाजाचे नाव उंचावण्याचा अभिमान - राठी



**जालना । प्रतिनिधी -** बहरिन या देशात जागतिक पातळीवर पार पडलेल्या आयर्न मॅन ट्रायथलॉन स्पर्धेत ७ तास ५५ मिनिटात १.९ किलोमीटर स्विमिंग, २१.१ किलोमीटर रनिंग आणि ९० किलोमीटर सायकलिंग अशी शानदार कामगिरी करत आयर्न मॅन ठरलेले उमंग बंग यांनी माहेश्वरी समाजाचे नाव जागतिक स्तरावर उज्वल केल्याबद्दल त्यांचा माहेश्वरी विवाह समितीच्यावतीने बुधवार दि. १ जानेवारी रोजी सत्कार करण्यात आला.

उमंग बंग हे जालना येथील उद्योजक व लायन्स क्लब जालनाच्या अध्यक्ष जयश्री लड्डा, प्रगत शेतकरी केंद्राचे संचालक अतुल लड्डा यांचे जावई आहेत. जागतिक पातळीवरील या स्पर्धेत ६० देशातील १४०० स्पर्धक सहभागी झाले होते. आयर्न मॅन होण्यासाठी सायकलिंग, स्विमिंग आणि रनिंग ते तीन टप्पे ८ तासात पूर्ण करावयाचे असतात. उमंग बंग यांनी हे ध्येय ७ तास ५५ मिनिटात पूर्ण करून नवा कीर्तिमान प्रस्थापित केला असून, त्यांचे नाव 'आयर्न मॅन' म्हणून गौरवले गेल्याबद्दल माहेश्वरी विवाह समितीच्या कार्यालयात उमंग बंग आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्राची बंग यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माहेश्वरी विवाह समितीचे अध्यक्ष कांतीलाल राठी होते. यावेळी जुगलकिशोर होलानी, मिठूलाल मंत्री, सुनील बियाणी, गणेश बियाणी, अतुल लड्डा, पुनमचंद जेथलिया, द्वारकादास मुंदडा, धर्मेंद्र लखोटिया, संतोष बाहेती यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती लावली.

सत्कारावेळी उमंग यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आयर्न मॅन स्पर्धा ही केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक क्षमताही तपासणारी असते. तीनही टप्पे पूर्ण करण्यासाठी मला शिस्तबद्ध सराव आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक होता. कुटुंबाचे आशीर्वाद, , पत्नी प्राचीने माझ्या आहाराचे केलेले नियोजन, तिचे सतत प्रोत्साहन आणि समाजाच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले. आयर्न मॅन बनणे हे फक्त शारीरिक क्षमतेवर नाही तर मानसिक धैर्यावरही अवलंबून असते. योग्य नियोजन आणि सतत प्रयत्न केल्यास कोणतीही गोष्ट शक्य आहे. कांतीलाल राठी म्हणाले की उमंग हे जालन्याचे जावई असून, माहेश्वरी समाजातील युवा पिढीसाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. समाजातील युवकांनी उमंगकडून प्रेरणा घेऊन आपल्या क्षेत्रात यशस्वी होण्याचा प्रयत्न करावा.

# परतुर वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. महेंद्रकुमार वेडेकर तर सचिवपदी ॲड. सुरेश काळे यांची निवड



**परतूर । प्रतिनिधी -** वकील संघ परतुर यांची नवीन कार्यकारिणी जाहीर दि.०२/१/२०२५, रोजी करण्यात आली.यावेळी बिनविरोध निवड झाली असून वकील संघाच्या अध्यक्षस्थानी ड.महिंद्रकुमार वेडेकर तर सचिवस्थानी ड.सुरेश काळे तसेच वकील संघाचे उपाध्यक्ष म्हणून आर. एल. पाईकराव, सहसचिव ॲड. नितीन मस्के.व ग्रंथपाल पदी, ॲड. सुभाष. एल. पडीभार. यांची निवड झाली असून सर्व सामाजिक, राजकीय व सर्वसामान्य जनतेतून या निवडीचे स्वागत करण्यात येत आहे. याप्रसंगी ड.सुरेश काळे यांनी बोलत असताना सांगितले जे वंचित घटक, शोषित,उपेक्षित आहेत जे वकिलांची फीस भरू शकत नाही अशा लोकांचे केसेस हे मोफत चालवल्या जातील अशी आमच्या प्रतिनिधीशी बोलत असतांना सांगितले.

# अवैधरित्या गोवंशाची वाहतूक करणारे वाहन पोलिसांनी पकडले

## गाडीतून १६ बैलांची केली सुटका

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात अवैधरित्या गोवंश वाहतूक करणारा आयशर ट्रक पोलिसांनी पकडलाय. चंदनझिरा पोलिसांनी ही कारवाई केली. दिनांक २ गुरुवार रोजी सकाळी दहा वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालन्यात गोवंश कोंबुन नेणारा आयशर क्रमांक चक२०.ऋउ.६५८० चंदनझिरा पोलिसांनी पकडलाय. दिनांक ०१/०१/२०२५ बुधवार रोजी रात्री ०८:३० वाजेच्या सुमारास नवीन मोंढ रोडवरील पेट्रोल पंपाजवळ रात्री पोसिसांनी नाकाबंदी केली होती. या वेळी एक आयशर ट्रक चक२०. ऋउ.६५८० पोलिसांनी अडवत तपासणी केली असता त्यात १६ बैल कोंबुन भरलेले आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी चालकावर गुन्हा दाखल करत सर्व गोवंशाची मध्ये सुटका केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आयशर चालक इरफान शेख महमूद राहणार सिल्लोड या चालकावर गुन्हा दाखल करत सर्व जनावरांची सुटका करून त्यांना गो शाळेत सोडले आहे.



सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी पोलिस उपअधीक्षक, करिश्मा चोधरी, उपनिरीक्षक घड सिंग, पोलीस हेड कॉन्स्टेबल जोरसिंग कलाणी, ठाकूर यांनी केली

# जुना जालना भागात रिक्षा चोरी करणारा आरोपी जेरबंद



**जालना । प्रतिनिधी -** जुना जालना भागात रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीस पोलिसांनी जेरबंद केलंय. आरोपीस ताब्यात घेवुन ९० हजार रुपये किंमतीची रिक्षा पोलिसांनी जप्त केलीय. जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केलीय.

दिनांक १९/१२/२०२४ रोजी बजाज ॲटो कंपणीचा रिक्षा चोरी गेल्यावरुन पोलीस ठाणे कदिम जालना येथे गु.र.न.५१०/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं.प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर चोरी गेलेला रिक्षा हा आमदरी, ता. औंढा नागनाथ येथील आरोपी नामे नागोराव महादेव पोटे यांनी चोरी केलेला आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाल्याने ओंढा नागनाथ येथे जावून आरोपी नामे नागोराव महादेव पोटे, वय ४० वर्षे राहणार आमदरी ता. कळमनुरी जि. हिंगोली यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुशंगाने चौकशी केली असता त्यांने गुन्हा केल्याची कबुली देवुन सदर गुन्हयातील बजाज ॲटो कंपनीची काळ्या रंगाची रिक्षा क्र.चक२१इऋ-१३८४ रिक्षा आरोपीने काढुन दिल्याने ती जप्त करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, पोउपनि. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसांद पव्हरे, गोपाल गोशिक, सागर बाविस्कर, ईरशाद पटेल, रमेश राठोड, रमेश काळे यांनी केली आहे.

# आ. अर्जुनराव खोतकर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय विटी दांडू अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** येथील पोलीस मैदान, जालना येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोकप्रिय आमदार अर्जुनभाऊ खोतकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त ९ व्या राज्यस्तरीय महिला व पुरुष विटी-दांडू (गिल्ली-दंडा) अजिंक्यपद स्पर्धा स्व . प्रशांत नवगिरे सर (विटी दांडू खेळाचे जनक) यांच्या स्मरणार्थ ४८८ पोलीस ग्राउंड, जालना येथे घेण्यात आल्या, यावेळी राज्यातील बारा संघांचा समावेश करण्यात आला, कार्यक्रमाचे उद्घाटक माननीय आमदार अर्जुन भाऊ खोतकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले व प्रमुख पाहुणे म्हणून अभिमन्यू खोतकर यावेळी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, पंडितराव भुतेकर, विठ्ठलराव मस्के, महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष श्री गजानन वाळके पाटील, उपाध्यक्ष राकेश खैरनार, जालना जिल्हा विटी दांडू अध्यक्ष बापासाहेब मस्के, सचिव विद्या नवगिरे, कोषाध्यक्ष विजय गाडेकर, प्रभारी सचिव ऑल इंडिया गौरव नवगिरे, नगरसेवक विजय पांगरकर, नगरसेवक महेश निकम, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे श्याम देशमुख शरद वाबळे सागर मगरे रामचंद्र भिंगारदेवे, दिलीप के पवार , प्रतीक्षा भिंगारदेवे, सुभाष पारे संजय शेळके प्रमोद खरात डॉक्टर हेमंत वर्मा संभाजी बादळ लखन जाधव भुजंग डावकर विजय गाडेकर श्री सोपान शिंदे प्रदीप राठोड कबीर सय्यद विकासाला शेवाळे सर भुजंग डावकर सोपान शिंदे नारायण भडांगे राजे देशपांडे सपकाळ सर रुपये अमरीश बोर्डे कल्याण नवल बळीराम पाटेकर सतीश गाभूळ चांद जयकुमार वावळे व समस्त क्रीडा शिक्षक



यावेळी अर्जुन भाऊ खोतकर यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत येणाऱ्या काळात विटी दांडू पारंपारिक खेळाला शालेय मान्यता देण्याची ग्वाही दिली

# इंडेवाडी येथील पाण्याच्या टाकीचा स्लॅब मोडकळीस आल्याने टाकी केली जमीनदोस्त

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक दोन गुरुवार रोजी दुपारी चार वयाच्या सुमारास महानगरपालिकेच्या वतीने इंडेवाडी येथील पाण्याच्या टाकीचा स्लॅब मोडकळीस आल्याने टाकी जमीनदोस्त करण्यात आलीय. जालना महानगर पालिकेतील अधिकाऱ्यांच्या निरीक्षणाखाली जेसीबीच्या सहाय्याने ही टाकी पाडण्यात आलीय. काही महिन्यांपूर्वी या टाकीचा स्लॅब मोडकळीस आला होता. त्यामुळे आज जालना महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या समक्ष ही पाण्याची टाकी जमीनदोस्त केली गेलीय. दरम्यान, यामुळे पाणी पुरवठ्यात कोणतीही बाधा येणार नसून थेट अंबडच्या टाकीतून पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती जालना महानगर पालिकेच्या वतीने देण्यात आलीय. इंदेवाडी येथे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी सन १९८० मध्ये २२ लक्ष लिटर क्षमतेच्या पाण्याची टाकी बांधण्यात आली होती. मात्र, कालांतराने या टाकीचे बांधकाम कमकुवत झाले. आणि आज अखेर ही टाकी पाडण्यात आलीय. या टाकीचे नवीन बांधकाम आता लवकरात लवकर सुरू केले जाईल अशी माहिती आहे.




# अशोका पब्लिक स्कूल मध्ये नवीन वर्षाचं स्वागत जल्लोषात

**मंठा । प्रतिनिधी -**अशोका पब्लिक स्कूल मध्ये नवीन वर्षाचे विद्यार्थ्यांनी जल्लोषात स्वागत केले गेले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेचे संस्थाचालक संजयकुमार चव्हाण यांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांना यशाच्या मार्गावर पुढे जाण्यासाठी प्रेरणा दिली,तसेच वैदिक गणिताच्या संकल्पना त्यांनी सांगितल्या उदा.वर्षाची सुरुवात ज्या वारा ने होते त्याच वारा ने शेवट होतो. यावेळी ग्रीटिंग कार्ड्स बनवून विद्यार्थ्यांनी हस्तकला सादर केल्या. काही विद्यार्थ्यांनी वर्ग खोलांची सजावट केली.अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमंसोबत विद्यार्थ्यांनी नवीन वर्षातील पहिला दिवस घालवला.यावेळी आरती कुलकर्णी,सविता हिवाळे, राधिका जोशी, धनश्री कपडे,प्राजक्ता आष्टीकर,वंदना मोरे, कांचन एखंडे,प्रियांका चींचने, आनंता निर्वल, ज्योती शहाणे यांनी सहकार्य केले.



# दर्पण दिनानिमित्त पीसीएमच्यावतीने पत्रकारांचा सन्मान व नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन



अर्जुनराव खोतकर | बबनराव लोणीकर | संतोष दानवे | नारायण कुचे | हिकमत उढाण

## पत्रकार संरक्षण कायदा व ऑनलाईन पत्रकारिता या विषयावर मार्गदर्शन; पीसीएम जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** दर्पणदिनानिमित्त येत्या सोमवार (दि ६) रोजी जिल्ह्यातील पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. त्याच बरोबर जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांच्या जाहीर सत्कार सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी दिली आहे. हा सन्मान सोहळा भोकरदन नाका, राजुर रोडवरील भारती लॉन्स येथे सकाळी ११ वा. होणार आहे.

पीसीएमच्यावतीने दर्पण दिनानिमित्त दरवर्षी पत्रकारांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात येते यंदाही जिल्ह्यातील पत्रकारांचा गौरव करण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारास पीसीएम जिल्हारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याच बरोबर सहा ज्येष्ठ व चार युवा पत्रकारांसह पत्रकारिता करत असतांना सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकार-समाजसेवकांचाही गौरव या सोहळ्यात करण्यात येणार असल्याची माहिती दीपक शेळके यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांमध्ये जालना विधानसभा मतदार संघाचे आमदार अर्जुनराव खोतकर, परतुर विधानसभा मतदार संघाचे बबनराव लोणीकर, भोकरदन मतदार संघाचे संतोष पा. दानवे, बदनापूर मतदार संघाचे नारायण कुचे, घनसावंगी मतदार संघाचे हिकमत उढाण यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील पत्रकार संरक्षण कायदा स्वरुप व आव्हाने विशेष अभ्यास या विषयात पीएचडी करत असलेले प्रा. विजय कमळे हे पत्रकारांना पत्रकार संरक्षण कायद्याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. त्याच बरोबर या कायद्याविषयी पत्रकारांचे काही प्रश्न असल्यास त्याचे समाधानही श्री कमळे यांच्याकडून करण्यात येणार आहे. डॉ. प्रभु गोरे हे ऑनलाईन पत्रकारिता या विषयावर मार्गदर्शन करणार आहे. पत्रकारांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरेही डॉ. गोरे प्रसंगी देणार आहेत.

त्याचबरोबर जिल्ह्यातील खेळाडू पत्रकारांसाठी जिल्हास्तरीय बॉक्स क्रिकेट लिग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पत्रकार खेळाडूंनी सोमवार (दि ६) पर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले असून त्यानंतर तालुकानिहाय संघ व जालना शहरातील संघ असे एकूण आठ संघामध्ये हि स्पर्धा होणार आहे.

पत्रकार सन्मान व आमदारांचा जाहीर सत्कार सोहळ्यास जिल्ह्यातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांच्यासह दर्पण जैन, गणेश काबरा, नितेश महाजन, आमेर खान, शेख चाँद पी.जे. नरेंद्र जोगड, बाबुजी तिवारी, सय्यद रफिक, सुनील भारती, प्रा. दत्ता देशमुख, मजहर सौदागर, आशिष तिवारी, दिनेश नंद, चेतन बजाज, शेख अशफाक, सौ. करुणा मोरे, शेख नबी सिपोराकर आदींनी केले आहे.

# अमृत बेकरी प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे बेरोजगारांना उद्योग उभारण्याची संधी

**जालना । प्रतिनिधी -** पुणे येथील महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत संस्थेच्या लक्षीत गटातील उमेदवारांसाठी मोफत अमृत बेकरी प्रशिक्षणावर आधारीत निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सुशिक्षित बेरोजगार युवकांना तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण छत्रपती संभाजी नगर येथे दि. २४ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२५ या अठरा दिवसाच्या कालावधीमध्ये देण्यात येणार आहे. इच्छुकांनी आपला प्रवेश अर्ज एमसीईडी जिल्हा कार्यालय, जालना येथे दि. १४ जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावा, अशी प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

बेकरी उत्पादन व्याप्ती आणि महत्त्व, बेकरीमध्ये विविध व्यवसाय संधी बेकरी उत्पादनाच्या उत्पादनासाठी विविध तंत्रे विविध बेकरी उत्पादने तयार करण्यासाठी विशेष उपकरणे आणि साधने आवश्यक आहेत, केकचे प्रकार, सिद्धांत आणि व्याहारिक, टी-टाईम केकचे विविध प्रकार सिद्धांत आणि व्यवहारिक एक्सप्लोर, कुकीजचे प्रकार सिद्धांत आणि व्यवहारिक, पफ पेस्ट्रीजचे प्रकार सिद्धांत आणि व्याहारिक, ब्रेंड, टोस्ट, पाव, पिझ्झा, बर्गर, बन इत्यादी तयार करणे सिद्धांत आणि व्यवहारिक, चॉकलेटचे सिद्धांत आणि व्याहारिक, प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योग करण्याची संधी या प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध होणार असून प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. तसेच जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे सदरील प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

सदरील प्रशिक्षण हे खुल्या प्रवर्गातील अमृत लक्षित गटातील उमेदवारांसाठी म्हणजे (ब्राह्मण, बनिया, वत्स, कम्मा, कायस्त, नायर, एयांगर, पाटीदार, बंगाली, पटेल, मारवाडी, यलमार, त्यागी, ठाकूर, मारवाडी, सेनगुनथर, सिंधी, राजपुरोहित, नायडू, यलमार,) इत्यादी प्रवर्गातील लाभार्थींना सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष मुलाखती द्वारे सहभागी होता येईल. प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान १२ वी पास, पदवीधर व तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष आहे. जालना जिल्हातील प्रत्येक तालुक्यातील उमेदवारांना प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाणपत्र/गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, तहसीलचे अधिवास प्रमाणपत्र, जातीचा उल्लेख असलेल्या कोणत्याही शासकीय कागदपत्राचा पुरावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असल्याचे तहसील उत्पन्न दाखला, विवाहित असल्यास महिलांसाठी गॅझेट किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा पॅन कार्ड प्रवेश अर्जासोबत छायांकित प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. ़.ारहरररीींी. ीस.ळप या संकेतस्थळावर आपला अर्ज अपलोड करून, अर्जाची हार्ड कॉपी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्राची छयांकित प्रत जोडून जिल्ह्यातील जिल्हा प्रकल्प अधिकारी या ठिकाणी प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये सादर करण्याची अंतिम दि. १४ जानेवारी असून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थींसाठी दि. १४ जानेवारी २०२५ रोजी एमसीईडी जिल्हा कार्यालय येथे निशुल्क एक दिवसीय परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी), द्वारा मराठा पार्क बिल्डींग विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर चौफुली, जालना दुरध्वनी क्र. ०२४८२ २२०५९२ या ठिकाणी संपर्क साधावा व आपला प्रवेश अर्ज सादर करावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज जयंती उत्सव

**जालना । प्रतिनिधी -** क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले चौक गांधी चमन जुना जालना येथे शुक्रवारी सकाळी ११ वाजता सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर हे राहणार आहेत. तर यावेळी प्रमुख पाहुणे आ. अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, भाजपाचे नेते भास्करराव दानवे, माजी सरपंच सुभाषराव पवार, माजी नगरसेवक विजय पवार, गंगुबाई वानखेडे, ओबीसी महामंडळाचे व्यवस्थापक जे. झेड. राठोड, नागेश राऊत, डॉ. श्रावण शेवाळे,अभियंता कटारे, डॉ. विशाल धानुरे, दिपक वैद्य, संतोष जमधडे, सुरेशराव रत्नपारखे, विष्णू पाचफुले, मुन्ना भोसले, दत्ता पा. घुले आदींची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन बाबासाहेब वानखेडे व आयोजन समितीचे सर्व सदस्य महात्मा फुले विचार मंच, जालना यांनी केले आहे.

युवा आदर्श

## सावित्रीमाई...

पती ज्यांचा ज्योती
उजळे शिक्षण वाती
अंधश्रद्धा अंधकार
पाहून तया पळती
सावित्रीमाई स्मरण
विचारा येई जाणती
आचरण रे विचारांचे
मनी लाऊया पणती
जळोत जुनाट प्रथा
जमवू समग्र माहिती
देऊ समृद्ध वारसा
नव पिढीच्या हाती
कोरा करा सातबारा
बळीराजा कर्जमुक्ती
सुदृढ अर्थ व्यवस्था
पोशिंद्या हीचं शक्ती
वाचून समजून घेऊ
ती साहित्य संस्कृती
ठसवूया मना मनात
सावित्रीमाई आकृती
फुले दांपत्य जागवे
माणूसकी श्रेष्ठ नाती
अभिवादन करे तया
शोभे पताके कनाती
विसरूनि भेदा भेद
करू समाजजागृती
पाळा नियम कायम
जोडूनि हात विनंती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.